**<u>ठळक बातम्या</u>**

- राज्यात आजही पावसाचा जोर कायम, मुंबई आणि उपनगरांसह अनेक ठिकाणी जनजीवन विस्कळीत /रायगड आणि पुणे घाट परिसराला रेड अलर्ट

- गेल्या दोन-तीन दिवसात पावसाशी संबंधित दुर्घटनांमधे राज्यात ८ जणांचा मृत्यू, १२ ते १४ लाख एकर क्षेत्रावरच्या पिकांचं नुकसान

- राज्यात ४२ हजार ८९२ कोटी रुपयांच्या गुंतवणूक करारांवर स्वाक्षऱ्या

- उपराष्ट्रपतीपदासाठी इंडिया आघाडीची उमेदवारी निवृत्त न्यायमूर्ती बी. सुदर्शन रेड्डी यांना जाहीर

**आणि**

- आशिया चषक टी-ट्वेंटी क्रिकेट स्पर्धेसाठी भारतीय संघाची घोषणा, कर्णधार सूर्यकुमार यादव, तर शुभमन गिल उपकर्णधार

**<><><><><>**

राज्यातपावसाचा जोर आजही कायम असून, गेल्या तीन-चार दिवसांत मोठ्या प्रमाणात झालेल्या अतिवृष्टीमुळे राज्यात ८ जणांचा बळी गेला, तर १२ ते १४ लाख एकरावरच्या पिकांना फटका बसला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज वार्ताहरांशी बोलताना ही माहिती दिली.....

***होल्ड... बाईट- देवेंद्र फडनवीस***

**मुंबई शहर आणि उपनगरांत** जोरदार पावसामुळे जनजीवन विस्कळीत झालं. मध्य आणि पश्चिम रेल्वेच्या रुळांवर पाणी साचल्यानं वाहतुकीवर परिणाम झाला. अनेक गाड्या रद्द करण्यात आल्या. शहरातल्या अनेक रस्त्यांवर पाणी साचल्यानं वाहतूक ठप्प झाली. बेस्ट बसगाड्यांचे मार्ग वळवण्यात आले.

**ठाणे** जिल्ह्यात भिवंडी, मुंब्रा भागात अनेक घरांमध्ये पाणी शिरलं, तसंच वाहतुकीलाही फटका बसला.

**हिंगोली** जिल्ह्यातल्या कळमनुरी तालुक्यात पुराच्या पाण्यात अडकलेल्या ८ नागरिकांची सुटका करण्यात आली.

**सोलापूर** जिल्ह्यात गेल्या दहा-बारा दिवसांपासून सतत पाऊस पडत असून गेल्या तीन दिवसांत त्याचा जोर वाढला आहे. इथल्या ८० गावांमधल्या ४१ हजार ४७२ हेक्टरवरच्या पिकाला पावसाचा फटका बसला आहे.

**परभणीत** संततधार पावसामुळे पूरस्थिती निर्माण झाली असून खरिपाच्या पिकांचं मोठं नुकसान झालं आहे.

**कोल्हापूर** जिल्ह्यात चार-पाच दिवसांपासून संततधार पावसामुळे काही रस्ते बंद झाले असून नद्या, ओले आणि नाल्यांचं पाणी पात्राबाहेर आलं. **सातारा** जिल्ह्यात कोयना धरणासह इतर मुख्य धरणांच्या पाणलोट क्षेत्रात पावसाचा जोर वाढला असून कोयना धरण जवळपास पूर्ण भरलं आहे. **सांगली** जिल्ह्यात संततधार सुरू असून वारणा आणि कृष्णा नद्या दुथडी भरून वाहात आहेत.

**यवतमाळच्या** उमरखेड तालुक्यात पुरामुळे पळशी आणि संगम चिंचोली या गावांचा संपर्क तुटला. इथल्या नागरिकांना बाहेर काढायचं काम सुरू आहे.

**बीड** जिल्ह्यात परळी तालुक्यातलं नागापूर धरणाचा जलायश ओसंडून वाहू लागल्यानं अनेक गावांचा पाणीप्रश्न सुटला. यामुळं नागरिकांमध्ये आनंदाचं वातावरण आहे.

**रायगड आणि पुणे घाट** परिसराला हवामान विभागानं रेड अलर्ट दिला, तर रत्नागिरी, कोल्हापूर घाट, सातारा घाट, मुंबई शहर, मुंबई उपनगर, ठाणे, पालघर, नाशिक घाट आणि नंदुरबार या भागांना ऑरेंज अलर्ट देण्यात आला आहे.

**<><><><><>**

सौरऊर्जा आणि विदा क्षेत्रातल्या १० सामंजस्य करारांवर मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांच्या उपस्थितीत आज मंत्रालयात स्वाक्षऱ्या झाल्या. या सामंजस्य करारांमुळे राज्यात ४२ हजार ८९२ कोटी रुपयांची गुंतवणूक होणार असून, २५ हजार ८९२ रोजगार उपलब्ध होतील, असं मुख्यमंत्र्यांनी सांगितलं.

<><><><>

मुंबई महानगर प्रदेश विकास योजनेच्या टप्पा ३ आणि ३A अंतर्गत नवीन रेल्वे गाड्यांची खरेदी करण्याला राज्यशासनानं मान्यता दिली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या मंत्रिमंडळ पायाभूत सुविधा समितीच्या बैठकीत हा निर्णय झाला. पहिल्या टप्प्यात तब्बल २६८ पूर्ण वातानुकूलित गाड्या खरेदी होणार असल्याचं मुख्यमंत्र्यांनी सांगितलं.

मुंबईत वडाळा डेपो ते गेटवे ऑफ इंडिया या १६ किलोमीटर लांबीच्या पूर्ण भूमिगत मार्गिकेच्या बांधकामाला, बेस्टबरोबर संयुक्त विकास प्रकल्पाअंतर्गत व्यावसायिक संकुल उभारायला, तसंच ठाणे ते नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळादरम्यान २५ किलोमीटर लांबीचा उन्नत मार्ग उभारायलाही मंजुरी देण्यात आली.

नागपूरमध्ये नवीन रिंग रोड उभारणी, नागपुरात एक नवनगर तयार करायला मान्यता दिल्याचंही मुख्यमंत्र्यांनी सांगितलं. पुणे–लोणावळा या उपनगरीय रेल्वे मार्गाच्या चौपदरीकरणाचं काम, तसंच पुणे मेट्रोच्या टप्पा एक अंतर्गत दोन नवीन स्थानकांना मंजुरी मिळाली असल्याचं त्यांनी सांगितलं.

<><><><>

टाटा मेमोरिअल सेंटर, एकात्मिक आयुर्वेदिक कर्करोग दवाखाना आणि संशोधन केंद्राच्या माध्यमातून रायगड जिल्ह्यात तांबाटी इथं शंभर खाटांचं रुग्णालय उभारणार आहे. या रुग्णालयासाठी दिलेल्या १० हेक्टर जमिनीच्या भाडेपट्टा करारवरच्या मुद्रांक शुल्कात सवलत द्यायला आज झालेल्या

मंत्रिमंडळाच्या बैठकीत मंजुरी देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस होते.

राज्यातल्या शासकीय वैद्यकीय महाविद्यालय आणि रुग्णालयात गट क आणि तांत्रिक संवर्गात २९ दिवस तत्त्वावर कार्यरत १७ कर्मचाऱ्यांची तातपुरती सेवा नियमित करण्याला मंत्रिमंडळानं आज मान्यता दिली.

**<><><><><>**

उपराष्ट्रपतीपदाच्या आगामी निवडणुकीसाठी इंडीया आघाडीनं सर्वोच्च न्यायालयाचे माजी न्यायाधीश न्यायमूर्ती बी. सुदर्शन रेड्डी यांना उमेदवारी दिली आहे. इंडीया आघाडीच्या सर्व घटकपक्षांनी एकमतानं रेड्डी यांच्या नावाला संमती दिल्याची माहिती काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांनी आज नवी दिल्लीत इंडीया आघाडीच्या घटकपक्षांच्या संयुक्त वार्ताहर परिषदेत दिली. ही निवडणूक विचारधारेची असून राज्यघटना जेव्हा धोक्यात येते, तेव्हा सगळे विरोधी पक्ष एकजुटीनं त्याविरोधात उभे राहतात, असं खर्गे म्हणाले.

**<><><><><>**

राष्ट्रीय लोकशाही आघाडीच्या संसदीय पक्षाच्या आज नवी दिल्ली इथं झालेल्या बैठकीत प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी एनडीएचे उपराष्ट्रपतीपदाचे उमेदवार सी. पी. राधाकृष्णन यांचा परिचय करून दिला, आणि त्यांची एकमतानं निवड करण्याचं आवाहन केलं.

**<><><><><>**

आशिया चषक टी-ट्वेंटी क्रिकेट स्पर्धेसाठी भारतीय संघाची घोषणा झाली आहे. या संघाचा कर्णधार सूर्यकुमार यादव असेल. शुभमन गिल याच्याकडे उपकर्णधार पदाची धुरा असेल. या संघात अभिषेक शर्मा, टिळक वर्मा, हार्दिक पंड्या, शिवम दुबे, अक्षर पटेल, जितेश शर्मा, जसप्रीत बुमराह, अर्शदीप सिंग, वरुण चक्रवर्ती, कुलदीप यादव, संजू सॅमसन, हर्षित राणा, रिंकू सिंग यांचा समावेश आहे.

आशिया चषक स्पर्धा येत्या ९ ते २८ सप्टेंबर दरम्यान अबुधाबी आणि दुबई इथं होईल. भारताचा पहिला सामना १० सप्टेंबरला संयुक्त अरब अमिरातीबरोबर होईल. तर, १४ सप्टेंबरला पाकिस्तानशी सामना होईल.

<><><><><>

राज्यमहोत्सव म्हणून साजऱ्या होणाऱ्या गणेशोत्सवाच्या बोधचिन्हाचं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज अनावरण केलं. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांच्यासह राज्य मंत्रिमंडळातले इतर मंत्री यावेळी उपस्थित होते. हे  बोधचिन्ह यंदाच्या उत्सवात सर्वत्र वापरलं जाईल, अशी माहिती सांस्कृतिक कार्य मंत्री आशिष शेलार यांनी यावेळी दिली.

<><><><><>

राज्यातल्या गणेशभक्तांच्या सोयीसाठी यंदा रेल्वेनं गाड्यांच्या ३६७ अतिरिक्त फेऱ्या सोडण्याचं नियोजन केलं आहे.  यासाठी  गणेशभक्तांच्या वतीनं आपण प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि  रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांचे आभार मानत असल्याचं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं आहे. गणेशोत्सवासाठी रेल्वेच्या जादा गाड्या सोडाव्यात अशी मागणी महाराष्ट्र शासनानं  केंद्रीय रेल्वे मंत्री आणि भारतीय रेल्वेकडे केली होती. त्याला  प्रतिसाद देत, गणेशभक्तांच्या सोयीसाठी रेल्वे गाड्यांच्या जादा फेऱ्यांचं  नियोजन केलं जाईल, असं आश्वासन रेल्वे मंत्र्यांनी पत्राद्वारे दिल्याची माहिती मुख्यमंत्र्यांनी प्रसिद्धी पत्रकातून दिली.

<><><><><>

ज्येष्ठ अभिनेता अच्युत पोतदार यांचं काल रात्री ठाण्यातल्या ज्युपिटर रुग्णालयात निधन झालं. ते ९१ वर्षांचे होते.

लष्करातून कॅप्टन म्हणून १९६७ मधे निवृत्त झाल्यानंतर इंडियन ऑईलमधे नोकरीत असताना त्यांनी अभिनयाचा छंद जोपासला. मराठी रंगभूमी, दूरचित्रवाहिनी मालिका, आणि चित्रपटांमधे विविध चरित्र भूमिकांमधे त्यांनी ठसा

उमटवला. १९८० मधे 'आक्रोश' आणि 'अल्बर्ट पिंटो को गुस्सा क्यों आता है' या गाजलेल्या चित्रपटांमधे त्यांनी त्यांच्या अभिनयाची चमक दाखवली आणि नंतर 'अर्धसत्य', 'नासूर', 'तेजाब', 'प्रहार', 'वंश', 'चमत्कार', 'रंगीला', 'अग्निसाक्षी', 'तीसरी आंख', 'परिणीता' अशा तब्बल सव्वाशे चित्रपटांमधे त्यांनी काम केलं. 'थ्री ईडियट्स' या चित्रपटातला "अरे कहना क्या चाहते हो?" हा त्यांचा संवाद तुफान लोकप्रिय ठरला. त्याखेरीज ९५ दूरचित्रवाहिनी मालिका, २६ नाटकं त्यांच्या नावावर जमा आहेत.

त्यांच्या पार्थिवावर ठाण्यातल्या स्मशानभूमीत आज अंत्यसंस्कार करण्यात आले.

//<><><><><>//